Prabhu Shri Ramchnadr Shikshan Prasarak Mandal Tondgaon's

Affileted with Sant Gadge Baba Amravati University, Amravati

Matoshri Shantabai Gote Arts, Commerce & Science College Washim

(NAAC Accredited With B Grade)

Department of Philosophy

॥ आनो भद्रा क्रतवो यन्तु विश्वतः ॥

Departmental Activities

2021-2022

Tattv-prakash Vyakhyanmala (Online Lectures)

Organized By Dr. Vedprakash Dongaonkar, Head Dept. of Philosophy
Matoshri Shantabai Gote Art, comm. & Sci. College, Washim

: तत्त्वप्रकाश व्याख्यानमला :
(2021-2022)

मातोश्री शांताबाई गोटे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील तत्वज्ञान विभागाद्वारे, "तत्वज्ञान विषयाचा प्रचार व प्रसार करणे आणि संशोधकांचे संशोधन व संशोधन पध्दती समोर आणणे" या उद्देशाने 'तत्व-प्रकाश' व्याख्यानमाला आयोजित केली जाते. या व्याख्यानमालेअन्तर्गत झालेली व्याख्याने ऐकन्यासाठी खलील यूट्यूब लिंक वर क्लिक करावे.

दूसरे पुष्प : 15/11/2021	विषय : रुसोचे तत्वज्ञान वक्ते : डॉ. सुभाषचंद्र भेलके YouTube link : https://youtu.be/rBzuTnvzwrM
तिसरे पुष्प : 15/12/2021	विषय : वेदतील मूल्य विचार वक्ते : डॉ. साहेबराव निगळ, मुंबई YouTube link : https://youtu.be/gA6lSVCC-zo
चौथे पुष्प : 15/01/2022	विषय : आधुनिकीकरण : एक समीक्षा वक्ते : डॉ. आऊसाहेब काळे, बार्शी YouTube link : https://youtu.be/vvmm4JlzQg
पाचवे पुष्प : 15/02/2022	विषय : मार्क्सवादी पद्धतीने करण्यात आलेला भारतीय तत्वज्ञानाचा अभ्यास : एक समीक्षा वक्त्या : डॉ. शुभदा जोशी, मुंबई YouTube link : https://youtu.be/liOPVrx8u5I
सहावे पुष्प : 15/03/2022	विषय : महाराष्ट्रातील सामाजिक बदल आणि मार्क्सवाद वक्ते : डॉ. मोहनराव देशमुख, अहमदनगर YouTube link : https://youtu.be/RNZyBMdyuBs
सातवे पुष्प : 15/04/2022	विषय : गीतेचा कर्मवाद वक्ते : डॉ. सदानंद मोरे, पुणे YouTube link : **https://youtu.be/9zd2TBbQzMA**
आठवे पुष्प : 15/05/2022	विषय : धर्मकीर्ती यांचे तत्वज्ञान वक्ते : डॉ. लता छत्रे, पुणे YouTube link : **https://youtu.be/3VoHnZbjvj8**

प्रभू श्री रामचंद्र शिक्षण प्रसारक मंडळ, तोंडगाव द्वारा संचालित

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ सलग्नित

मातोश्री शांताबाई गोटे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, वाशिम

नॅक द्वारा 'ब' दर्जा प्राप्त

तत्त्वज्ञान विभाग

॥ आनो भद्रा क्रतवो यन्तु विश्वत: ॥

तत्त्व–प्रकाश व्याख्यानमाला

धर्मकीर्ति हा समन्वयवादी तत्त्वज्ञ आहे - डॉ. लता छत्रे

गोटे महाविद्यालयाच्या 'तत्त्व-प्रकाश व्याख्यानमालेचे' आठवे पुष्प संपन्न

(आजादी का अमृत महोत्सव आणि बुद्ध पौर्णिमा विशेष)

मातोश्री शांताबाई गोटे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील तत्त्वज्ञान विभागाद्वारे, तत्त्वज्ञान विषयाचा प्रचार व प्रसार करणे आणि संशोधकांचे संशोधन समोर आणणे या उद्देशाने 'तत्त्व-प्रकाश' व्याख्यानमाला आयोजित केली जाते. या व्याख्यानमालेचे आठवे पुष्प सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे येथील तत्त्वज्ञान विभागाचे माजी विभागप्रमुख तथा बौद्ध तत्त्वज्ञानाच्या अभ्यासिका डॉ. लता छत्रे यांनी गुंफले. डॉ. लता छत्रे यांनी 1985 या वर्षी पुणे विद्यापीठातून डॉ. एम. पी. मराठे यांच्या मार्गदर्शनात " धर्मकीर्तिस फिलोसोफी : ए फ्रेश स्टडी" या विषयावर संशोधन केले. सदर संशोधन विषयाला अनुसरुन 15 में 2022 या दिवशी त्यांनी 'धर्मकीर्ति यांचे तत्त्वज्ञान' या विषयावर आपले व्याख्यान दिले.

डॉ. छत्रे यांनी आपल्या व्याख्यानातून, गौतम बुद्धाने केलेले उपदेश, त्या उपदेशाचे झालेले संकलन आणि त्यावर झालेले भाष्य यावर प्रकाश टाकला. यावेळी त्यांनी त्रिपीटिकांचा आधार घेत बौद्ध दर्शनकार नागार्जुन, वसूबंधू आणि दिग्नाग यांनी कशा पद्धतीने बुद्धांच्या विचाराला आकार दिला हे सांगण्याचा प्रयत्न केला. मात्र त्याच बरोबर त्यांनी धर्मकिर्तिच्या दृष्टिकोनातून या तिन्ही तत्त्ववेत्त्यांच्या विचाराची समीक्षा करीत धर्मकीर्ति याने नेमके काय तत्त्वज्ञान सांगितले हे उपस्थितांसमोर मांडले. त्यात प्रामुख्याने धर्मकीर्ति बाह्य जगताकडे कशा पद्धतीने पाहतो. त्याने प्रत्यक्ष आणि अनुमान या प्रमाणांच्या संदर्भात जी भूमिका मांडली आहे ती कशाप्रकारे इतरांपेक्षा वेगळी आहे. अशा अनेक विषयांचा उलगडा करीत असताना धर्मकीर्ति हा बौद्ध दर्शनातला एक समन्वयवादी तत्त्वज्ञ आहे; याविषयीचा संकेत डॉ. छत्रे यांनी या प्रसंगी केला.

व्याख्यानाच्या प्रारंभी व्याख्यानमालेचे आयोजक तत्त्वज्ञान विभाग प्रमुख डॉ. वेदप्रकाश डोणगावकर यांनी वक्त्यांचा परिचय करुन देत व्याख्यानमालेचा उद्देश स्पष्ट केला. यावेळी त्यांनी सध्या भारतामध्ये आजादी का अमृत महोत्सव साजरा केला जात आहे आणि त्या अनुषंगाने भारतीय तत्त्ववेत्यांच्या विचारांचा जागर करण्याच्या हेतुने आजचे हे व्याख्यान महत्वाचे असल्याचे सांगितले. याशिवाय याच महिन्यामध्ये बुद्धपौर्णिमा असल्याकारणाने बुद्धाच्या विचारांना व्यवस्थित आकार देणाऱ्या 'धर्मकीर्तिचे तत्त्वज्ञान' या विषयावर होऊ घातलेले हे व्याख्यान वैशिष्ट्यपूर्ण असल्याचे ही त्यांनी सांगितले. व्याख्यानानंतर व्याख्यात्यांचे व उपस्थितांचे आभार मानले. या कार्यक्रमासाठी महाराष्ट्र व महाराष्ट्रच्या बहेरिल विविध विद्यापीठातील प्राध्यापक, अभ्यासक, संशोधक, विद्यार्थी आणि तत्त्वज्ञान प्रेमी उपस्थित होते.

Officiating Principal
Matoshri Shantabai Gote Arts
Com.& Sci.College,Washim

तत्त्वज्ञान विषयाच्या प्रचार व प्रसाराच्या उद्देशाने !

प्रभू श्रीरामचंद्र शिक्षण प्रसारक मंडळ तोंडगाव द्वारा संचालित
मातोश्री शांताबाई गोटे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, वाशिम

तत्त्वज्ञान विभाग द्वारा आयोजित

तत्त्व-प्रकाश व्याख्यानमाला

पुष्प आठवे

दिनांक : 15 मे 2022, वेळ : रात्री : 08 वा.

-: वक्ते :-

मा. डॉ. लता छत्रे

माजी तत्त्वज्ञान विभाग प्रमुख,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे

-: विषय :-

धर्मकीर्ति यांचे तत्त्वज्ञान

(1985 च वर्षी डॉ. लता छत्रे यांना **'Dharmakirti's Philosophy : A fresh study'** या विषयावर अभ्यासून पुणे विद्यापीठाने **Ph. D.** पदवी प्रदान केली आहे.)

प्रत्येक महिन्याच्या
15 तारखेला
रात्री
08 वाजता

-: विनीत :-

डॉ. वेदप्रकाश झोणगावकर (मठवाले)
तत्त्वज्ञान विभाग प्रमुख,
मातोश्री शांताबाई गोटे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, वाशिम
मो. 9096908100

https://meet.google.com/buf-dcub-vho

Prabu Shri Ramchandra Shikshan Prasarak Mandal, Tondgaon's

Matoshri Shantabai Gote Art's, Commerce & Science College, Washim

Department of Philosophy's

Tattva-Prakash Vyakhyanmala

(Stablished For Research & It's Methodology in Philosophy)

Introduction of ~~Spiker~~ Speaker

Topic of Lecture:	धर्मकिर्तीचे तत्त्वज्ञान
Date of Lecture:	15/05/2022
Name of Spiker:	Dr. Lata Chatre
Date of Birth:	07/07/1954
Qualification:	M.A. Philosophy & Anthropology Ph. D. (1985)
Ph. D. Topic:	Dharmakirtis Philosophy : A Fresh Study
His / Her Research Guide:	Prof. M. P. Marathe (Pune University, Pune)
Work Place & Post :	1) Professor (2000-2017) & Head (2015-2017) at Dept. Of Philosophy, Pune University, Pune
Publication:	1) Budhist Logic : Dharmakirtis Philosophy : A Fresh Study 2) Abhidhammakosh : A Study With a New Perspective 3) Budhist Epistemology : Logic and Language 4) A philosophical Devlopment of Budhist Theory of Apoha 5) बौद्ध दर्शनातील स्त्री विचार
Projects:	1) Budhist theory of Human action with refrence ti Abhidhammakosh 2) Theory of Apoha A Glimpse to Nayay & Budhist controversy 3) Budhist Theory of Conciseness 4) Gautam Budha and reconstruction of Society. 5) वारली अदिवासींची संस्कृती 5) रा. धो. कर्वे यांचे कार्य
Award:	1) Jivan Gaurav Puraskar by Mahila Darshanik Parishad – 2002 2) Sarsvat Puraskar 3) Ruiya Rtana Puraskar by Ruiya Colleg, Mimbai
Interest Aria / Hobs :	Buddhism,
Any Other	Budhist Logic : Dharmakirtis Philosophy : A Fresh Study

Officiating Principal
Matoshri Shantabai Gote Arts
Com.& Sci.College,Washim

देशोन्नती

धर्मकीर्ति हा समन्वयवादी तत्वज्ञ आहे -डॉ.लता छत्रे

गोटे महाविद्यालयाच्या तत्त्वज्ञाता व्याख्यानमालेचे आठवे पुष्प संपन्न

देशोन्नती वृत्तसंकलन...

वणिज ■ भारतीय आचार्य परंपरा, चर्चेचे व वितंडा मार्गाविलंबनकर्ते बौद्ध तत्त्वज्ञ विद्वानांचा, बौद्धतत्त्व विचारधारा, बौद्धतत्त्व विचारधारा इत्यादि व इतर बाबींचा सर्वांगीण अभ्यास व उहापोह करण्याच्या उद्देशाने 'बौद्ध-दर्शन' व्याख्यानमालेचा आयोजित केली आहे. या व्याख्यानमालेचे आठवे पुष्प महिलेसाठी पुणे पुष्प विद्यापीठ पुष्प पुणेचे बौद्धतत्त्व विभागाचे माजी विभागप्रमुख तथा बौद्ध तत्त्वज्ञानाच्या अभ्यासिका डॉ. लता छत्रे यांचे गुंफले. डॉ. लता छत्रे यांनी १९८५ ते २०१५ पर्यंत पुष्प विद्यापीठात डॉ. लता पै. लता मंगेशकर ' धर्मकीर्ति विद्यालयाचे ए बौद्ध दर्शन' या विषयावर संशोधन पूर्ण. त्यांनी संशोधन विषयाला अनुसरून २०१२ ते २०१२ या दिवशी त्यांनी 'धर्मकीर्ति यांचे तत्त्वज्ञान' या विषयावर आपले व्याख्यान दिले.

डॉ. छत्रे यांनी आपल्या व्याख्यानातून, बौद्ध तुलने नेमलेले दर्शन, त्या उपदेशाचे संकलन आणि त्यात होणारे बदल यावर प्रकाश टाकला. यांनी त्यांनी त्रिपिटकाचा अभ्यास केला होता. बौद्ध दर्शनात सापडणारे, संघातू आणि दिग्नाग यांचे ज्ञान घेऊन पुढच्या विद्वानांचा अभ्यास दिला. ते व्याख्यानात प्रकाश केला. यांच त्यांनी धर्मकीर्तिच्या दृष्टिसंग्रहात या विषयी तत्त्वज्ञानाचा विद्यार्थी संकेत यांनी धर्मकीर्ति यांचे नेमके काय तत्त्वज्ञान सांगितले. ते उपस्थितांसमोर मांडले. त्यात प्रामुख्याने धर्मकीर्ति यांना अनुमानाचे चार घटकांचे खरचे. त्यांचे प्रत्यक्ष आणि अनुमान या प्रमाणांचा मांडणी ही भूमिका यातली आहे ही व्याख्यानात उलगडा दिली आहे. अशा आणि विविध उलगडा यातील धर्मकीर्ति हा बौद्ध दर्शनाचा एक तत्त्वज्ञानी मन्वा आहे, धर्मकीर्तीचे तत्त्वज्ञ डॉ. लता छत्रे यांनी उलगडा केला.

व्याख्यानाच्या प्रारंभी व्याख्यानमालेचे आयोजक तत्त्वज्ञान विभाग प्रमुख डॉ. नेटकर यांनी प्रास्ताविक करीत व्याख्यानमालेचा उद्देश स्पष्ट केला. यांनी त्यांनी उलगडा व्याख्यानाचे आयोजन यासाठी या प्रमुख वक्त्यांना पाचारण केला आहे असे सांगितले. व्याख्यानमालेचे संयोजक विभागाचे प्राध्यापक डॉ. नेटकर यांनी केले. व्याख्यानाचे आभार प्रदर्शन प्रा. डॉ. पुरुषोत्तम भोयर यांनी मानले. व्याख्यानाला विद्यार्थी, अध्यापक, संशोधक, विद्वानांची उपस्थिती होती (स.प.)

SHIVTARAM GOTE ARTS, COM & SCI COLLEGE

Officiating Principal
Matoshri Shantabai Gote Arts
Com.& Sci.College,Wanadhri

धर्मकीर्ति हा समन्वयवादी तत्वज्ञ आहे -डॉ.लता छत्रे

गोटे महाविद्यालयाच्या 'तत्त्व-प्रकाश व्याख्यानमालेचे' आठवे पुष्प संपन्न

देशोन्नती वृत्तसंकलन...

वाशिम ■ मातोश्री शांताबाई गोटे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील तत्त्वज्ञान विभागाद्वारे, तत्त्वज्ञान विषयाचा प्रचार व प्रसार करणे आणि संशोधकांचे संशोधन समोर आणणे या उद्देशाने 'तत्त्व-प्रकाश' व्याख्यानमाला आयोजित केली जाते. या व्याख्यानमालेचे आठवे पुष्प सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे येथील तत्त्वज्ञान विभागाचे माजी विभागप्रमुख तथा बौद्ध तत्त्वज्ञानाच्या अभ्यासिका डॉ. लता छत्रे यांनी गुंफले. डॉ. लता छत्रे यांनी १९८५ या वर्षी पुणे विद्यापीठातून डॉ. एम. पी. मराठे यांच्या मार्गदर्शनात 'धर्मकीर्तिस फिलोसोफी : ए प्रेक्ष स्टडी' या विषयावर संशोधन केले. सदर संशोधन विषयाला अनुसरून १५ मे २०२२ या दिवशी त्यांनी 'धर्मकीर्ति यांचे तत्त्वज्ञान' या विषयावर आपले व्याख्यान दिले.

डॉ. छत्रे यांनी आपल्या व्याख्यानातून, गौतम बुद्धाने केलेले उपदेश, त्या उपदेशाचे झालेले संकलन आणि त्यावर झालेले भाष्य यावर प्रकाश टाकला. यावेळी त्यांनी त्रिपीटिकांचा आधार घेत बौद्ध दर्शनकार नागार्जुन, वसुबंधू आणि दिग्नाग यांनी कशा पद्धतीने बुद्धांच्या विचाराला आकार दिला हे सांगण्याचा प्रयत्न केला. मात्र त्याच बरोबर त्यांनी धर्मकीर्तिच्या दृष्टिकोनातून या तिन्ही तत्त्ववेत्त्यांच्या विचाराची समीक्षा करीत धर्मकीर्ति याने नेमके काय तत्त्वज्ञान सांगितले हे उपस्थितांसमोर मांडले. त्यात प्रामुख्याने धर्मकीर्ति बाह्य जगताकडे कशा पद्धतीने पाहतो, त्याने प्रत्यक्ष आणि अनुमान या प्रमाणांच्या संदर्भात जी भूमिका मांडली आहे ती कशाप्रकारे इतरांपेक्षा वेगळी आहे, अशा अनेक विषयांचा उलगडा करीत असताना धर्मकीर्ति हा बौद्ध दर्शनातला एक समन्वयवादी तत्त्वज्ञ आहे; याविषयीचा संकेत डॉ. छत्रे यांनी या प्रसंगी केला.

व्याख्यानाच्या प्रारंभी व्याख्यानमालेचे आयोजक तत्त्वज्ञान विभाग प्रमुख डॉ. वेदप्रकाश डोणगावकर यांनी वक्त्यांचा परिचय करुन देत व्याख्यानमालेचा उद्देश स्पष्ट केला. यावेळी त्यांनी सध्या भारतामध्ये आजादी का अमृत महोत्सव साजरा केला जात आहे आणि त्या अनुषंगाने भारतीय तत्त्ववेत्त्यांच्या विचारांचा जागर करण्याच्या हेतुने आजचे हे व्याख्यान महत्त्वाचे असल्याचे सांगितले. याशिवाय याच महिन्यामध्ये बुद्धपौर्णिमा असल्याकारणाने बुद्धाच्या विचारांना व्यवस्थित आकार देणाऱ्या 'धर्मकीर्तिचे तत्त्वज्ञान' या विषयावर होऊ घातलेले हे व्याख्यान वैशिष्ट्यपूर्ण असल्याचे ही त्यांनी सांगितले. व्याख्यानानंतर व्याख्यात्यांचे व उपस्थितांचे आभार मानले. या कार्यक्रमासाठी महाराष्ट्र व महाराष्ट्रच्या बहेरिल विविध विद्यापीठातील प्राध्यापक, अभ्यासक, संशोधक, विद्यार्थी आणि तत्त्वज्ञान प्रेमी उपस्थित होते. (ता.प्र.)

दै. देशोन्नती, दि. 19/मे/2022

Officiating Principal
Matoshri Shantabai Goto Arts
Com.& Sci.College,Washim

प्रभू श्री रामचंद्र शिक्षण प्रसारक मंडळ, तोंडगाव द्वारा संचालित

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ सलग्नित

मातोश्री शांताबाई गोटे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, वाशिम

नॅक द्वारा 'ब' दर्जा प्राप्त

तत्त्वज्ञान विभाग

।। आनो भद्रा क्रतवो यन्तु विश्वत: ।।

तत्त्व–प्रकाश व्याख्यानमाला

भगवद्गीता हे कर्माचे तत्त्वज्ञान आहे - डॉ. सदानंद मोरे

(गोटे महाविद्यालयाच्या 'तत्त्व-प्रकाश व्याख्यानमालेचे' सातवे पुष्प संपन्न)

दिनांक : 15 एप्रिल 2022, वाशिम

मातोश्री शांताबाई गोटे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील तत्त्वज्ञान विभागाद्वारे, तत्त्वज्ञान विषयाचा प्रचार व प्रसार करणे आणि संशोधकांचे संशोधन समोर आणणे या उद्देशाने 'तत्त्व-प्रकाश' व्याख्यानमाला आयोजित केली जाते. या व्याख्यानमालेचे सातवे पुष्प सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे येथील तत्त्वज्ञान विभागाचे माजी विभागप्रमुख तथा सुप्रसिद्ध साहित्यिक डॉ. सदानंद मोरे यांनी गुंफले. डॉ. मोरे यांनी 1982 या वर्षी पुणे विद्यापीठातून डॉ. मराठे यांच्या मार्गदर्शनात "दि गीता : ए थिअरी ऑफ ह्यूमन ॲक्शन" या विषयावर संशोधन केले. सदर संशोधन विषयाला अनुसरुन 15 एप्रिल 2022 या दिवशी त्यांनी "गीतेचा कर्मवाद" या विषयावर आपले व्याख्यान दिले.

डॉ. सदानंद मोरे यांनी आपल्या व्याख्यानातून, आपल्या संशोधन प्रबंधातील एका एका प्रकरणावर प्रकाश टाकला. त्यापैकी त्यांनी 'फॅलसी ऑफ कमिशन' या प्रकरणांमध्ये, गीतेमधील अर्जुनाचे जे प्रश्न आहेत ते मानसिक स्वरूपाची नाहीत तर ती तात्विक स्वरूपाची आहेत, हे दाखविण्याचा प्रयत्न केला. याशिवाय 'परस्पेक्टिवे ऑफ ह्यूमन ॲक्शन' या प्रकरणातून त्यांनी गीतेशी संबंधित असलेल्या युधिष्टिर, दुर्योधन, श्रीकृष्ण, अर्जुन इत्यादींच्या वेगवेगळ्या दृष्टीकोनावर देखील प्रकाश टाकला. याप्रसंगी डॉ. सदानंद मोरे यांनी भगवद्गीता हे एक स्वतंत्र प्रस्थान आहे. ती श्रुती नाही तर स्मृति आहे. गीतेचा अभ्यास करीत असताना तिला उपनिषदाच्या चौकटीतून नव्हे तर महाभारताच्या चौकटीतून पाहिले पाहिजे. महत्त्वाचे म्हणजे "भगवद्गीता हा केवळ धार्मिक ग्रंथ नाही तर ते सामाजिक, राजकीय आणि मानवी कर्माला प्रेरित करणारे तत्त्वज्ञान आहे," असे मत मांडले.

व्याख्यानाच्या प्रारंभी व्याख्यानमालेचे आयोजक तत्त्वज्ञान विभाग प्रमुख डॉ. वेदप्रकाश डोणगावकर यांनी वक्त्यांचा परिचय करुन देत व्याख्यानमालेचा उद्देश स्पष्ट केला. आणि व्याख्यानानंतर व्याख्यात्यांचे व उपस्थितांचे आभार मानले. या कार्यक्रमासाठी महाराष्ट्राच्या विविध विद्यापीठातील प्राध्यापक, अभ्यासक, संशोधक, विद्यार्थी आणि तत्त्वज्ञान प्रेमी उपस्थित होते.

Officiating Principal
Matoshri Shantabai Gote Arts
Com.& Sci.College,Washim

तत्त्वज्ञान विषयाच्या प्रचार व प्रसाराच्या उद्देशाने !

प्रभू श्रीरामचंद्र शिक्षण प्रसारक मंडळ तोंडगाव द्वारा संचालित
मातोश्री शांताबाई गोटे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, वाशिम

तत्त्वज्ञान विभाग द्वारा अयोजित

तत्त्व-प्रकाश व्याख्यानमाला

पुष्प सातवे

दिनांक : 15 एप्रिल 2022, वेळ : रात्री : 08 वा.

-: वक्ते :-

मा. डॉ. सदानंद मोरे

माजी तत्त्वज्ञान विभाग प्रमुख,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे

-: विषय :-

गीतेचा कर्मवाद

(1982 [illegible] 'The Geeta A Theory of Human Action' [illegible] Ph. D. [illegible])

प्रत्येक महिन्याच्या
15 तारखेला
रात्री
08 वाजता

-: विनीत :-

डॉ. वेदप्रकाश डोणगावकर (मठवाले)
तत्त्वज्ञान विभाग प्रमुख,
मातोश्री शांताबाई गोटे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, वाशिम
मो. 9096908100

https://meet.google.com/buf-dcub-vho

Prabu Shri Ramchandra Shikshan Prasarak Mandal, Tondgaon's

Matoshri Shantabai Gote Art's, Commerce & Science College, Washim

Department of Philosophy's

Tattva-Prakash Vyakhyanmala

(Stablished For Research & It's Methodology in Philosophy)

Introduction of ~~Spiker~~ Speaker

Topic of Lecture:	गीतेचा कर्मवाद
Date of Lecture:	15/04/2022
Name of Spiker:	Dr. Sadanand More
Date of Birth:	25/06/1952
Qualification:	M.A. Ph. D. (1982)
Ph. D. Topic:	The Geeta A Theory of Human Action
His / Her Research Guide:	Prof. M. P. Marathe (Pune University, Pune)
Work Place & Post :	1) Professor & Head Dept.of Philosophy, Pune University, Pune
Publication:	**Book :** 32 Books Published **Paper :** 100
Achievement / Activity :	**Post Doctorate:** 1) Krushna : The man and his mission
Award:	34 Awards
Interest Aria / Hobs :	Literature of Santa
Any Other	Consultant of Maharshtra tattvdnyan Parishad In 2015 President of 88th Marathi sahity Sammelan, Guhan President of Suryoday Sahitya Sammelan, Jalgaon President of Sahitya Sanskruti Mandal, Maharashtr Govt.

MATOSHRI SHANTABAI GOTE ARTS, COM. & SCI. COLLEGE * WASHIM *

Officiating Principal
Matoshri Shantabai Gote Arts
Com.& Sci.College,Washim

देशोन्नती

भगवतगिता हे कर्माचे तत्वज्ञान आहे !

- प्रतिपादन साहित्यिक डॉ. सदानंद मोरे यांचे प्रतिपादन
- गोटे महाविद्यालयात तत्व-दर्शन व्याख्यानमालेतील पहिले पुष्प संपन्न

Washim Edition
Apr 24, 2022 Page No. 2
Powered by : eReleGo.com



Officiating Principal
Matoshri Shantabai Gote Arts
Com.& Sci.College,Washim

वाशिम, रविवार, दि. २४ एप्रिल २०२२ २

देशोन्नती आपला

भगवतगिता हे कर्माचे तत्वज्ञान आहे !

- प्रसिध्द साहित्यीक डॉ. सदानंद मोरे यांचे प्रतिपादन
- गोटे महाविद्यालयाच्या 'तत्त्व-प्रकाश व्याख्यानमालेचे' सातवे पुष्प संपन्न

देशोन्नती वृत्तसंकलन...

वाशिम ■ भगवद्गीता हे एक स्वतंत्र प्रस्थान आहे. ती श्रुती नाही तर स्मृति आहे. गीतेचा अभ्यास करीत असताना तिला उपनिषदाच्या चौकटीतून नव्हे तर महाभारताच्या चौकटीतून पाहिले पाहिजे. महत्त्वाचे म्हणजे भगवद्गीता हा केवळ धार्मिक ग्रंथ नाही तर ते सामाजिक, राजकीय आणि मानवी कर्माला प्रेरित करणारे तत्त्वज्ञान आहे, असे मत सुप्रसिद्ध साहित्यिक डॉ. सदानंद मोरे यांनी मांडले.

मातोश्री शांताबाई गोटे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील तत्त्वज्ञान विभागाद्वारे, तत्त्वज्ञान विषयाचा प्रचार व प्रसार करणे आणि संशोधकांचे संशोधन समोर आणने या उद्देशाने 'तत्त्व-प्रकाश' व्याख्यानमाला आयोजित केली जाते. या व्याख्यानमालेचे सातवे पुष्प सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे येथील तत्त्वज्ञान विभागाचे माजी विभागप्रमुख तथा , सुप्रसिद्ध साहित्यिक डॉ. सदानंद मोरे यांनी गुंफले. डॉ. मोरे यांनी १९८२ चा वर्षी पुणे विद्यापीठातून डॉ. मराठे यांच्या मार्गदर्शनात दि गीता : ए थिअरी ऑफ ह्यूमन ॲक्शन या विषयावर संशोधन केले. सदर संशोधन विषयाला अनुसरुन १५ एप्रिल २०२२ या दिवशी त्यांनी गीतेचा कर्मवाद या विषयावर आपले

व्याख्यान दिले. डॉ. सदानंद मोरे यांनी आपल्या व्याख्यानातून, आपल्या संशोधन प्रबंधातील एका एका प्रकरणावर प्रकाश टाकला. त्यापैकी त्यांनी 'फॅलसी ऑफ कमिशन' या प्रकरणामध्ये, गीतेमधील अर्जुनाचे जे प्रश्न आहेत ते मानसिक स्वरूपाची नाहीत तर ती तात्विक स्वरूपाची आहेत, हे दाखविण्याचा प्रयत्न केला. याशिवाय 'परस्पेक्टिवे ऑफ ह्यूमन ॲक्शन' या प्रकरणातून त्यांनी गीतेशी संबंधित असलेल्या युधिष्टिर, दुर्योधन, श्रीकृष्ण, अर्जुन इत्यादींच्या वेगवेगळ्या दृष्टीकोनावर देखील प्रकाश टाकला. व्याख्यानाच्या प्रारंभी व्याख्यानमालेचे आयोजक तत्त्वज्ञान विभाग प्रमुख डॉ. वेदप्रकाश डोगगावकर यांनी वक्त्यांचा परिचय करुन देत व्याख्यानमालेचा उद्देश स्पष्ट केला. आणि व्याख्यानानंतर व्याख्यात्यांचे व उपस्थितांचे आभार मानले.

मातोश्री शांताबाई गोटे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील तत्त्वज्ञान विभागाद्वारे, तत्त्वज्ञान विषयाचा प्रचार व प्रसार करणे आणि संशोधकांचे संशोधन समोर आणणे या उद्देशाने 'तत्त्व-प्रकाश' व्याख्यानमाला आयोजित केली जाते.

यो कार्यक्रमासाठी महाराष्ट्राच्या विविध विद्यापीठातील प्राध्यापक, अभ्यासक, संशोधक, विद्यार्थी आणि तत्त्वज्ञान प्रेमी उपस्थित होते. (ता.प्र.)

MATOSHRI SHANTABAI GOTE ARTS, COM & SCI. COLLEGE * WASHIM *

Officiating Principal
Matoshri Shantsbai Gote Arts
Com.& Sci.College,Washim

प्रभू श्री रामचंद्र शिक्षण प्रसारक मंडळ, तोंडगाव द्वारा संचालित

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ सलग्नित

मातोश्री शांताबाई गोटे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, वाशिम

नॅक द्वारा 'ब' दर्जा प्राप्त

तत्त्वज्ञान विभाग

॥ आनो भद्रा क्रतवो यन्तु विश्वतः ॥

तत्त्व–प्रकाश व्याख्यानमाला

भारतात ही आर्थिक भेद आहेत, पण त्याकडे आपले म्हणावे तसे लक्ष गेले नाही । - डॉ. मोहनराव देशमुख

(गोटे महाविद्यालयाच्या 'तत्त्व-प्रकाश व्याख्यानमालेचे' सहावे पुष्प संपन्न)

दिनांक : 15 मार्च 2022, वाशिम,

मातोश्री शांताबाई गोटे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील तत्त्वज्ञान विभागाद्वारे, तत्त्वज्ञान विषयाचा प्रचार व प्रसार करणे आणि संशोधकांचे संशोधन समोर आणणे या उद्देशाने 'तत्त्व-प्रकाश' व्याख्यानमाला आयोजित केली जाते. या व्याख्यानमालेचे सहावे पुष्प न्यू आर्टस्, कॉमर्स अँड सायन्स, अहमदनगर येथील तत्त्वज्ञान विभागाचे माजी विभागप्रमुख डॉ. मोहनराव देशमुख यांनी गुंफले. डॉ. देशमुख यांनी 1989 या वर्षी पुणे विद्यापीठातून डॉ. सुंदरराजन यांच्या मार्गदर्शनात संशोधन केले. सदर संशोधन विषयाला अनुसरुन 15 मार्च 2022 या दिवशी त्यांनी "महाराष्ट्रातील सामाजिक बदल आणि मार्क्सवाद" या विषयावर आपले व्याख्यान दिले.

डॉ. मोहनराव देशमुख यांनी आपल्या व्याख्यानातून, सामाजिक बदल म्हणजे काय याविषयी सविस्तर माहिती देली. यावेळी त्यांनी महाराष्ट्राच्या सामाजिक बदलांमध्ये संयुक्त महाराष्ट्राची चळवळ आणि त्यानंतर उदयाला आलेले सहकार क्षेत्र, कामगार चळवळी इत्यादीचा आढावा घेतला. आज सहकार क्षेत्र आणि कामगार चळवळी संपुष्टात येत आहेत आणि त्यासाठी भांडवलदारी व्यवस्था कारणीभूत असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले.

मार्क्सवादी विचारधारा ही प्रामुख्याने आर्थिक भेद मिटविण्याचा उद्देशाने समोर आलेली विचारधारा आहे. मात्र आपल्या भारतामध्ये आर्थिक वर्गापेक्षा जातिवर्ग अधिक प्रभावी असल्यामुळे मार्क्सवादासाठी म्हणावे तसे अनुकूल वातावरण लाभले नाही. आपल्या भारतात ही आर्थिक भेद आहेत. मात्र आपल्याकडच्या लोकांनी धर्म, परंपरा, सणवार ईश्वर, मंत्रतंत्र यासारख्या बाबींना अधिक महत्त्व दिल्याने म्हणावा तसा आपला वैचारिक पाया मजबूत होऊ शकला नाही, किंबहुना यामुळेच आर्थिक भेदाकडे आपले म्हणावे तसे लक्ष गेले नाही, अशी खंतही त्यांनी यावेळी व्यक्त केली.

व्याख्यानाच्या प्रारंभी व्याख्यानमालेचे आयोजक तत्त्वज्ञान विभाग प्रमुख डॉ. वेदप्रकाश डोणगावकर यांनी वक्त्यांचा परिचय करुन देत व्याख्यानमालेचा उद्देश स्पष्ट केला. आणि व्याख्यानानंतर व्याख्यात्यांचे व उपस्थितांचे आभार मानले. या कार्यक्रमासाठी महाराष्ट्राच्या विविध विद्यापीठातील प्राध्यापक, अभ्यासक, संशोधक, विद्यार्थी आणि तत्त्वज्ञान प्रेमी उपस्थित होते.

Officiating Principal
Matoshri Shantabai Gote Arts
Com.& Sci.College,Washim

तत्त्वज्ञान विषयाच्या प्रचार व प्रसाराच्या उद्देशाने !

प्रभू श्रीरामचंद्र शिक्षण प्रसारक मंडळ लोणीगाव द्वारा संचालित
मातोश्री शांताबाई गोटे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, वाशिम

तत्त्वज्ञान विभाग द्वारा अयोजित

तत्त्व-प्रकाश व्याख्यानमाला

पुष्प सहावे

दिनांक : 15 मार्च 2022, वेळ : रात्री : 08 वा.

-: वक्ते :-

मा. डॉ. मोहनराव देशमुख

सेवानिवृत्त प्राध्यापक न्यू आर्ट्स कॉलेज, अहमदनगर

-: विषय :-

महाराष्ट्रातील सामाजिक बदल आणि मार्क्सवाद

(1989 या वर्षी डॉ. देशमुख सर यांना सदर विषयावर अहमदनगर पुणे विद्यापीठाची Ph. D. पदवी प्रदान केली आहे.)

प्रत्येक महिन्याच्या
15 तारखेला
रात्री
08 वाजता

-: विनीत :-

डॉ. देवप्रकाश डोलगावकर
तत्त्वज्ञान विभाग प्रमुख,
मातोश्री शांताबाई गोटे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, वाशिम
मो. 9096908100

https://meet.google.com/buf-dcub-vho



Officiating Principal
Matoshri Shantabai Gote Arts
Com.& Sci.College,Washim

प्रभू श्री रामचंद्र शिक्षण प्रसारक मंडळ, तोंडगाव द्वारा संचालित

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ सलग्नित

मातोश्री शांताबाई गोटे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, वाशिम

नॅक द्वारा 'ब' दर्जा प्राप्त

तत्त्वज्ञान विभाग

।। आनो भद्रा क्रतवो यन्तु विश्वत: ।।

तत्त्व–प्रकाश व्याख्यानमाला

लोकयतांचा धर्म हा अर्थ व काम या पुरताच आहे. -डॉ. शुभदा जोशी

(गोटे महाविद्यालयाच्या 'तत्त्व-प्रकाश व्याख्यानमालेचे' पाचवे पुष्प संपन्न)

दिनांक. 15 फेब्रुवारी 2022,

मातोश्री शांताबाई गोटे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील तत्त्वज्ञान विभागाद्वारे, तत्त्वज्ञान विषयाचा प्रचार आणि प्रसार करण्याच्या उद्देशाने आयोजित 'तत्त्व-प्रकाश' व्याख्यानमालेचे पाचवे पुष्प मुंबई विद्यापीठातील तत्त्वज्ञान विभागाच्या माजी विभागप्रमुख डॉ. शुभदा जोशी यांनी गुंफले. डॉ. जोशी यांनी 1985 या वर्षी मुंबई विद्यापीठातून डॉ. एस. जी. मुद्गल यांच्या मार्गदर्शनात प्रसिद्ध इतिहासकर देवीप्रसाद चट्टोपाध्याय यांच्या "लोकायत ग्रंथावर चिकित्सक समीक्षा" या विषयाला अनुसरन संशोधन केले. सदर संशोधन विषयाला अनुसरुन 15 फेब्रूवारी 2022 या दिवशी त्यांनी ,"मार्क्सवादी पद्धतीने विशद झालेले भारतीय तत्त्वज्ञान : एक चिकित्सक समीक्षा" या विषयावर आपले व्याख्यान दिले.

डॉ. शुभदा जोशी यांनी आपल्या व्याख्यानातून, देवीप्रसाद चट्टोपाध्याय हे मार्क्सवादी होते. त्यांच्यावर मार्क्सवादाचा मोठा प्रभाव होता. त्या प्रभावातूनच त्यांनी भारतीय तत्त्वज्ञानातील ऋग्वेद, उपनिषदे, सांख्य, तंत्र, लोकायत, जैन आणि बौद्ध दर्शनांची मार्क्सवादी पद्धतीने मांडणी केली, असे मत व्यक्त केले. पुढे त्या म्हणाल्या की, देवीप्रसाद चट्टोपाध्याय यांनी समाजाचा अभ्यास करत असताना अर्थशास्त्रीय प्रगतीला महत्त्व दिले आणि त्या दृष्टिकोनातून त्यांनी तत्त्वज्ञान, धर्म, नीती, साहित्य, कला, इतिहास इत्यादीचा विचार केला. एका अर्थाने चटोपाध्याय यांनी भारतीय धर्म व तत्त्वज्ञानाला भौतिकवादी दृष्टिकोणातून पाहण्याचा आणि मांडण्याचा प्रयत्न केला असल्याचा भाव डॉ. शुभदा जोशी यांनी व्यक्त केला. याप्रसंगी डॉ. शुभदा जोशी यांनी प्रामुख्याने चटोपाध्याय यांनी मांडलेल्या लोकायत दर्शनासंबंधी काही मूलभूत प्रश्न उपस्थित केले. त्या म्हणाल्या की, चटोपाध्याय यांनी विधी अर्थात रुढी-परंपरांच्या आधारे लोकायत व तंत्र यांच्यात साम्य पाहण्याचा प्रयत्न केला. मात्र त्याचबरोबर चटोपाध्याय यांनी लोकायतांना तार्किक ही ठरविले. तेव्हा लोकायत हे जर तार्किक असतील तर ते विधी वा रूढी वगैरे गोष्टी कशा काय मान्य करू शकतात ? असा प्रश्न उपस्थित होतो. याशिवाय चटोपाध्याय लोकयतांना अनुमान हे प्रमाण मान्य असल्याविषयीचे सांगतात. भारतीय दर्शनातील अनेकांनी अनुमानाच्या आधारे ईश्वर आदि तत्त्वांचा स्वीकार केलेला आहे. तेव्हा अनुमान स्वीकारून चार्वाकांना अडचण निर्माण होऊ शकणार नाही का ? असा प्रश्नही डॉ. शुभदा जोशी यांनी उपस्थित केला. वास्तविक पाहता भारतीय तत्त्वज्ञानात धर्म, अर्थ, काम, मोक्ष हे चार पुरुषार्थ सांगण्यात आले आहेत. मात्र यापैकी लोकायत हे केवळ अर्थ आणि काम हे दोनच पुरुषार्थ स्वीकारतात आणि यावरून लोकायतांचा धर्म हा अर्थ व काम एवढ्यापुरताच मर्यादित आहे; याकडे डॉ. शुभदा जोशी यांनी श्रोत्यांचे लक्ष वेधले.

व्याख्यानाच्या प्रारंभी व्याख्यानमालेचे आयोजक तत्त्वज्ञान विभाग प्रमुख डॉ. वेदप्रकाश डोणगावकर यांनी वक्त्यांचा परिचय करून देत व्याख्यानमालेचा उद्देश स्पष्ट केला. आणि व्याख्यानानंतर व्याख्यात्यांचे व उपस्थितांचे आभार मानले. या कार्यक्रमासाठी महाराष्ट्राच्या विविध विद्यापीठातील प्राध्यापक, अभ्यासक, संशोधक, विद्यार्थी आणि तत्त्वज्ञान प्रेमी उपस्थित होते.

Officiating Principal
Matoshri Shantabai Gote Arts
Com.& Sci.College,Washim

तत्त्वज्ञान विषयाच्या प्रचार व प्रसाराच्या उद्देशाने !

प्रभू श्रीरामचंद्र शिक्षण प्रसारक मंडळ तोंडगाव द्वारा संचालित
मातोश्री शांताबाई गोटे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय वाशिम

तत्त्वज्ञान विभाग द्वारा आयोजित

तत्त्व-प्रकाश व्याख्यानमाला

पुष्प पाचवे

दिनांक : 15 फेब्रुवारी 2022, वेळ : रात्री : 08 वा

Vaccination

-: वक्ते :-

मा. डॉ. शुभदा जोशी

माजी तत्त्वज्ञान विभाग प्रमुख, मुंबई विद्यापीठ, मुंबई

-: विषय :-

मार्क्सवादी पद्धतीने विशद झालेले भारतीय तत्त्वज्ञान :
एक चिकित्सक समीक्षा

(1985 या वर्षी जोशी मॅडम यांना मुंबई विद्यापीठाच्या मार्गदर्शनाखाली Ph. D. पदवी प्रदान करण्यात आली आहे.)

प्रत्येक महिन्याच्या
15 तारखेला
रात्री
08 वाजता

विनीत
डॉ. वेदप्रकाश ढोणगावकर
तत्त्वज्ञान विभाग प्रमुख,
मातोश्री शांताबाई गोटे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय वाशिम
मो. 9096908100

https://meet.google.com/buf-dcub-vho

Prabu Shri Ramchandra Shikshan Prasarak Mandal, Tondgaon's

Matoshri Shantabai Gote Art's, Commerce & Science College, Washim

Department of Philosophy's

Tattva-Prakash Vyakhyanmala

(Stablished For Research & It's Methodology in Philosophy)

Introduction of Spiker Speaker

Topic of Lecture:	मार्क्सवदी पद्धतीने विशद झालेले भारतीय तत्त्वज्ञान : एक चिकित्सक समिक्षा
Date of Lecture:	15/02/2022
Name of Spiker:	Dr. Shubhda Joshi
Date of Birth:	17/04/1954
Qualification:	M.A. Ph. D. (1985)
Ph. D. Topic:	Lokayat A critical study : Indian Spiritualism Pry Assure
His / Her Research Guide:	Prof. S. G. Mudgal (Mumbai University, Mumbai)
Work Place & Post :	1) Ram Narayan Ruiya college, Mumbai (1974-1987) 2) Professor & Head Dept.of Philosophy, Mumbai University, Mumbai (1987-2016)
Publication:	**Book :** 1) Lokayat A critical study 2) Woman in Ancient & midlevel India 3) Prespectiv on Maharashtra : Cultural, Intellectual Contributions **Paper :** 50
Achievement / Activity :	**Post Doctorate:** 1) Krushna : The man and his mission
Award:	1) Jivan Gaurav Puraskar by Mahila Darshanik Parishad – 2002 2) Sarsvat Puraskar 3) Ruiya Rtana Puraskar by Ruiya Colleg, Mimbai
Interest Aria / Hobs :	Buddhism, Hinduism, Yoga, Indian Morals
Any Other	BOS Member/ Member of Academic council of Mumbai University/ Janral Secretry of Indian Philosophical Ass./ Membar of Editor of Pramarsh, IPQ & tattvdyan Mandir

Officiating Principal
Matoshri Shantabai Gote Arts
Com.& Sci.College,Washim



Officiating Principal
Matoshri Shantabai Gote Arts
Com.& Sci.College,Washim

देशोन्नती माझं शहर

वाशिम, सोमवार, दि. २१ फेब्रुवारी २०२२

२

महिला - सांस्कृतिक

लोकयतांचा धर्म हा अर्थ व काम या पुरताच -डॉ. शुभदा जोशी

- गोटे महाविद्यालयाच्या 'तत्त्व-प्रकाश व्याख्यानमालेचे' पाचवे पुष्प संपन्न

देशोन्नती वृत्तसंकलन...

वाशिम ■ मातोश्री शांताबाई गोटे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील तत्त्वज्ञान विभागाद्वारे, तत्त्वज्ञान विषयाचा प्रचार आणि प्रसार करण्याच्या उद्देशाने आयोजित 'तत्त्व-प्रकाश' व्याख्यानमालेचे पाचवे पुष्प मुंबई विद्यापीठातील तत्त्वज्ञान विभागाच्या माजी विभागप्रमुख डॉ. शुभदा जोशी यांनी गुंफले.

डॉ. जोशी यांनी १९८५ या वर्षी मुंबई विद्यापीठातून डॉ. एस. जी. मुदगल यांच्या मार्गदर्शनात प्रसिद्ध इतिहासकार देवीप्रसाद चट्टोपाध्याय यांच्या लोकायत ग्रंथावर चिकित्सक समीक्षा या विषयाला अनुसरुन संशोधन केले. सदर संशोधन विषयाला अनुसरुन १५ फेब्रुवारी २०२२ या दिवशी त्यांनी मार्क्सवादी पद्धतीने विशद झालेले भारतीय तत्त्वज्ञान : एक चिकित्सक समीक्षा या विषयावर आपले व्याख्यान दिले. डॉ. शुभदा जोशी यांनी आपल्या व्याख्यानातून, देवीप्रसाद चट्टोपाध्याय हे मार्क्सवादी होते. त्यांच्यावर मार्क्सवादाचा मोठा प्रभाव होता. त्या प्रभावातूनच त्यांनी भारतीय तत्त्वज्ञानातील ऋग्वेद, उपनिषदे, सांख्य, तंत्र, लोकायत, जैन आणि बौद्ध दर्शनांची मार्क्सवादी पद्धतीने मांडणी केली, असे मत व्यक्त केले. पुढे त्या म्हणाल्या की, देवीप्रसाद चट्टोपाध्याय यांनी समाजाचा अभ्यास करत असताना अर्थशास्त्रीय प्रगतीला महत्व दिले आणि त्या दृष्टिकोनातून त्यांनी तत्वज्ञान, धर्म, नीती, साहित्य, कला, इतिहास इत्यादींचा विचार केला. एका अर्थाने चट्टोपाध्याय यांनी भारतीय धर्म व तत्वज्ञानाला भौतिकवादी दृष्टिकोणातून पाहण्याचा आणि मांडण्याचा प्रयत्न केला असल्याचा भाव डॉ. शुभदा जोशी यांनी व्यक्त केला. याप्रसंगी डॉ. शुभदा जोशी यांनी प्रामुख्याने चट्टोपाध्याय यांनी मांडलेल्या लोकायत दर्शनासंबंधी काही मूलभूत प्रश्न उपस्थित केले. मात्र त्याबरोबर चट्टोपाध्याय यांनी लोकायतांना तार्किक ही ठरविले. तेव्हा लोकायत हे जर तार्किक असतील तर ते विधी वा रूढी वगैरे गोष्टी कशा काय मान्य करू शकतात ? असा प्रश्न उपस्थित होतो.

याशिवाय चट्टोपाध्याय लोकायतांना अनुमान हे प्रमाण मान्य असल्याविषयीचे सांगतांत व्याख्यानाच्या प्रारंभी व्याख्यानमालेचे आयोजक तत्त्वज्ञान विभाग प्रमुख डॉ. वेदप्रकाश डोणगावकर यांनी वक्त्यांचा परिचय करुन देत व्याख्यानमालेचा उद्देश स्पष्ट केला. आणि व्याख्यानानंतर व्याख्यात्यांचे व उपस्थितांचे आभार मानले. (ता.प्र.)

MATOSHRI SHANTABAI GOTE ARTS COM. & SCI. COLLEGE WASHIM

Officiating Principal
Matoshri Shantabai Gote Arts
Com.& Sci.College,Washim

Prabhu Shri Ramchnadra Shikshan Prasarak Mandal Tondgaon's

Affileted with Sant Gadge Baba Amravati University, Amravati

Matoshri Shantabai Gote Art's, Commerce & Science College, Washim

(NAAC Accredited with 'B' Grade)

Department of Philosophy

Tattvgyan Prashnamanjusha

Quiz – 2

https://forms.gle/4TWznqQoKmsuXKtR9


तत्त्वज्ञान प्रश्नमंजुषा भाग - 2
Email *
Full Name
Search


Contact No. *
Your city *
1) तत्त्वज्ञानाला इंग्रजीमध्ये काय म्हणतात ?
Philosophy
Ethics
Psycology
Logic
2) तत्त्वज्ञानचा इतिहास किती वर्ष प्राचीन आहे ?
1000
2000
3000
Search







Summary of Responses




1) तत्वज्ञानाला इंग्रजीमध्ये काय म्हणतात ?
214 responses
Copy
Philosophy
Ethics
Psycology
Logic
98.6%
2) तत्वज्ञानाचा इतिहास किती वर्ष प्राचीन आहे ?
207 responses
Copy
1000
2000
3000
तिपटन 5000
72%
12.6%
Search
Desktop
ENG
8:52 AM


3) ही तत्वज्ञानाची एक शाखा आहे -
215 responses
Copy
70.2%
18.6%
4) हे वैदिक दर्शन आहे :
215 responses
Copy
57.7%
21.9%
Search
Desktop
ENG
8:53 AM


5) महावीरांचे तत्त्वज्ञान कोणत्या धर्माशी संबंधित आहे ?
214 responses
Copy
हिंदू
जैन
बौद्ध
इस्लाम
83.2%
6) ही तत्त्वज्ञनातली एक संकल्पना आहे-
214 responses
Copy
70.6%
7%
11.7%
Search
Desktop
99%
ENG
8:53 AM


7) सॉक्रेटिस हा तत्त्वज्ञ कोणत्या देशाचा नागरिक होता ?
215 responses
Copy
भारत
अमेरिका
इंग्लंड
ग्रीक
87.4%
8) कोणत्या तत्त्वज्ञेत्याला विषाचा प्याला देण्यात आला होता ?
213 responses
Copy
प्लेटोनिस्ता
झेनोफोन
सॉक्रेटिसला
अरिस्टॉटलनाहीत
15.1%
Search
Desktop
99%
ENG
8:53 AM


9) भगवद गीता हा कशाचा भाग आहे ?
Copy
214 responses
92.7%
6.5%
10) हे बौद्ध तत्त्वज्ञानातली एक संकल्पना आहे -
Copy
214 responses
66.4%
12.1%
11.2%
Google Forms
Search
Desktop
ENG
8:53 AM

प्रभू श्री रामचंद्र शिक्षण प्रसारक मंडळ, तोंडगाव द्वारा संचालित

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ सलग्नित

मातोश्री शांताबाई गोटे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, वाशिम

नॅक द्वारा 'ब' दर्जा प्राप्त

तत्त्वज्ञान विभाग

वाशिम
२०००-२००१

॥ आनो भद्रा क्रतवो यन्तु विश्वतः ॥

तत्त्व–प्रकाश व्याख्यानमाला

आधुनिकीकरण म्हणजे पाश्चात्यांचे अनुकरण करणे नव्हे - डॉ. भाऊसाहेब काळे

(गोटे महाविद्यालयाच्या 'तत्त्व-प्रकाश व्याख्यानमालेचे' चौथे पुष्प संपन्न)

दिनांक. 15 जानेवारी 2022, स्थानिक मातोश्री शांताबाई गोटे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील तत्वज्ञान विभागाद्वारे, तत्वज्ञान विषयाचा प्रचार आणि प्रसार करण्याच्या उद्देशाने आयोजित 'तत्त्व-प्रकाश' व्याख्यानमालेचे चौथे पुष्प बार्शी येथील श्रीमान झाडबुके महाविद्यालयाचे सेवानिवृत प्राध्यापक डॉ. भाऊसाहेब काळे यांनी गुंफले.

मानवी जीवनात तत्वज्ञान हे एक महत्वाचा विषय आहे तेव्हा अशा या महत्वपूर्ण विषयाचा प्रचार आणि प्रसार करण्याच्या उद्देशाने मातोश्री शांताबाई गोटे महाविद्यालय येथील तत्वज्ञान विभागाद्वारे ही 'तत्व-प्रकाश' व्याख्यानमाला सुरू करण्यात आली आहे. या व्याख्यानमाले अंतर्गत प्रत्येक महिन्याच्या पंधरा (15) तारखेला रात्री 08 वाजता एक व्याख्यान आयोजित केले जाते. दिनांक 15 जानेवारी 2022 या रोजी व्याख्यानमालेचे चौथे पुष्प बार्शी येथील श्रीमान झाडबुके महाविद्यालयाचे सेवानिवृत प्राध्यापक डॉ. भाऊसाहेब काळे यांनी गुंफले.

डॉ. काळे यांनी 1984 या वर्षी पुणे विद्यापीठातून डॉ. एस. सुंदरराजन यांच्या मार्गदर्शनात **Some perspective on Modernization : a critical study** या विषयावर संशोधन केले. सदर संशोधन विषयाला अनुसरुन 15 जानेवारी या दिवशी त्यांनी 'आधुनिकीकरण : एक समीक्षा" या विषयावर आपले व्याख्यान दिले.

डॉ. काळे यांनी आपल्या व्याख्यानातून, हुकूमशाही व्यवस्था, साम्यवादी व्यवस्था आणि भांडवलशाही व्यवस्था इत्यादीवर प्रकाश टाकत नव मार्क्सवाद कसा उदयाला आला हे सांगितले. नव मार्क्सवाद हा म्हणावा तसा प्रभावी ठरला नाही. मात्र त्यामुळे साम्यवाद आणि भांडवलशाही व्यवस्थेचा प्रभाव कमी होऊन त्यात समतोल राखता येईल असे एक वातावरण निर्माण झाले होते. समाजाच्या विकासासाठी स्वातंत्र्य आवश्यक असते. परंतु स्वातंत्र्य हे भयमुक्त असले पाहिजे. अर्थात आधुनिकीकरणाच्या प्रवाहात हुकूमशाही हा पर्याय म्हणून टिकू शकला नाही, हे त्यांनी निदर्शनास आणून दिले.

आधुनिकीकरणाच्या प्रवासात वैज्ञानिक आणि तार्किक विचारसरणी प्रभावी ठरत गेली. त्यातूनच धर्म चिकित्सा होऊन औद्योगिक क्रांती झाली. परंतु यात मूल्याधिष्ठित व्यवस्थेकडे समाजाचे दुर्लक्ष होत गेले. तेव्हा पाश्चात्य देशात उदयाला आलेल्या अशा या विविध विचारप्रवाहांची समीक्षा झाली पाहिजे असा भाव व्यक्त करीत त्यांनी पाश्चात्यांचे अनुकरण करणे म्हणजे आधुनिकीकरण नव्हे हे ठामपणे सांगितले. सामान्यतः आधुनिकीकरणाच्या या प्रवासात वैज्ञानिक आणि यांत्रिक प्रगतीला महत्त्व दिले गेले. परंतु आत्मिक व मानसिक प्रगती सुद्धा तितकीच महत्वाची आहे आणि त्यासाठी अध्यात्मिक, सांस्कृतिक क्षेत्रातील विविध मूल्यांचा विचारसुद्धा होणे आवश्यक आहे. भारतीय धर्म परंपरेत अनेक चांगले विचार आहेत त्यांना नवीन रूप देऊन, त्यांचा नवीन अर्थ सांगून विज्ञान आणि अध्यात्मामध्ये समतोल राखून शाश्वत प्रगती करण्याचे कार्य या आधुनिकीकरणाच्या प्रवासात करता येऊ शकते याकडेही डॉ. भाऊसाहेब काळे यांनी श्रोत्यांचे लक्ष वेधले.

व्याख्यानाच्या प्रारंभी व्याख्यानमालेचे आयोजक तत्वज्ञान विभाग प्रमुख डॉ. वेदप्रकाश डोणगावकर यांनी वक्त्यांचा परिचय करुन देत व्याख्यानमालेचा उद्देश स्पष्ट केला. आणि व्याख्यानानंतर व्याख्यात्यांचे व उपस्थितांचे आभार मानले. या कार्यक्रमासाठी महाराष्ट्राच्या विविध विद्यापीठातील प्राध्यापक, अभ्यासक, संशोधक, विद्यार्थी आणि तत्वज्ञान प्रेमी उपस्थित होते.

Officiating Principal
Matoshri Shantabai Gote Arts
Com.& Sci.College,Washim

तत्त्वज्ञान विषयाच्या प्रचार व प्रसाराच्या उद्देशाने !

प्रभू श्रीरामचंद्र शिक्षण प्रसारक मंडळ तोंडगाव द्वारा संचालित
मातोश्री शांताबाई गोटे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय वाशिम

तत्त्वज्ञान विभाग द्वारा अयोजित

तत्त्व-प्रकाश व्याख्यानमाला

पुष्प चौथे

दिनांक : **15** जानेवारी **2022**, वेळ : रात्री : **08** वा

Use Cycle

Wear Mask

-: वक्ते :-

मा. डॉ. भाऊसाहेब काळे

सेवानिवृत्त प्राध्यापक
श्रीमान भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालय, बार्शी

-: विषय :-

आधुनिकीकरण : एक समीक्षा

Some Perspectives on Modernization : A critical study

(1984 या वर्षी काळे सरांना या विषयावर **Ph. D.** प्राप्त आहे.)

प्रत्येक महिन्याच्या
15 तारखेला
रात्री 08 वाजता

विनीत
डॉ. वेदप्रकाश डोणगावकर
तत्त्वज्ञान विभाग प्रमुख,
मातोश्री शांताबाई गोटे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय वाशिम
मो. 9096908100

https://meet.google.com/buf-doub-vho

वक्त्यांचा परिचय

नाव : डॉ. भाऊसाहेब पांडूरंग काळे

जन्म : 01 / 06 / 1951

शिक्षण :

बी. ए. : 1974 फरग्यूसन कॉलेज, पूणे

एम. ए. : 1976 पूणे विद्यापीठ, पूणे

पीएच. डी : 1984 पूणे विद्यापीठ, पूणे

मार्गदर्शक : डॉ. एस. सुंदरराजन

विषय :

नौकरी ठिकाण : श्रीमान झाडबूके महाविद्यालय, बार्शी, जी. सोलापूर

अनुभव : 33 वर्ष

पीएच. डी मार्गदर्शक मान्यता : 2006

पीएच. डी झालेले विद्यार्थी : 07

प्रकाशने :

पुस्तक : सौंदर्यशास्त्राची रुपरेषा (सहलेखक)

परामर्श, साधना साप्ताहिक, विचारशलाका, दार्शनिक त्रैमासिक, नचिकेत मधून अनेक लेख प्रकाशित

महाराष्ट्र तत्त्वज्ञान परिषदेचे माजी सल्लागार

सोलापूर विद्यापीठाच्या तत्त्वज्ञान अभ्यास मंडळाचे माजी सदस्य

महाराष्ट्र तत्त्वज्ञान परिषद व अखिल भारतीय दर्शन परिषदेचे आजीव सभासद

Officiating Principal
Matoshri Shantabai Gote Arts
Com. & Sci. College, Washim



तत्त्व–प्रकाश व्याख्यानमालेसाठी उपस्थित श्रोते

तत्त्व–प्रकाश व्याख्यानमालेचे चौथे पुष्प गुंफतांना डॉ. भारूसाहेब काळे

Officiating Principal
